नि.दि.दा.क्र.३२७/२०१२
विठठल विरुध्द दशरथ
नि.क्र. ३७ पुढे सुरु.

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र.१ (स्वतः वादी) ची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. यु.एच.सणस</u>** -

सौ. रंजना विठठल येवले माझी पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्याकामी मला तिने मुख्त्यारपत्र दिलेले नाही. भैरु धोंडू येवले हे गट नं. २१७ चे मुळ मालक होते. दावा मिळकतीचे क्षेत्र १ गुंठयाकरीता व्यवहार करताना मा. जिल्हाधिकारी हयांची तुकडेबंदी कायद्याअंतर्गत आवश्यक असणारी परवानगी घेण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २१७ चे एकूण क्षेत्र ३ गुंठे आहे व त्यात १ गुंठे क्षेत्र पोटखराब आहे. मी प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी गट क्र.२१७ चा ७/१२ उतारा पाहिला होता. आता मला तो ७/१२ उतारा दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्यात १ गुंठे क्षेत्राला घरपड अशी नोंद आहे. सदरील दस्त साक्षीदारास उलटतपासादरम्यान दाखविण्यात आले असल्याने त्यास **<u>नि.क्र.६०</u>** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, त्या उता–याला गोठापड अशी नोंद दिसुन येत नाही.

ताराबाई गणपत काटे ही प्रतिवादी दशरथ हयांची बहिण आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिस प्रस्तुत दाव्याकामी पक्षकार म्हणून सामील करण्यात आलेले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, तिचे नाव साक्षीदार म्हणून दाव्यात नमूद आहे. तथापि, मी तिला साक्षीदार म्हणून तपासणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या घरपड नोंद असलेल्या क्षेत्रात प्रतिवादी दशरथ हयाने घराचे बांधकाम केले होते व तो त्याच्या हयातीत तेथे कुटुंबासह राहत होता तसेच त्याच्या म्रुत्युनंतर त्याचे कुटुंब तेथे राहते आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या घरात पाण्याचे व लाईटचे कनेक्शन आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या घराची नोंद ग्रामपंचायतीला प्रतिवादी दशरथच्या नावे झालेली असून तो त्याचे कर भरतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या घराच्या पूर्वेस रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या रस्त्यापासुन गट क्र. २१७ ही मिळकत अर्धा फुट उंचीवर आहे. दावा मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार करतेवेळी मी प्रतिवादी दशरथ तसेच ताराबाई हयांची लेखी संमती घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, भैरु धोंडू येवले हयास लिहता वाचता येत नव्हते, तसेच ताराबाई काटे हिला देखील लिहता वाचता येत नव्हते. भैरु धोंडू येवले हयास

खरेदीखतातील मजकूर वाचून दाखविण्यात आला होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखताच्या व्यवहाराच्यावेळी म्हणजेच सन १९९५ मध्ये प्रतिवादी दशरथ हा अंदाजे ३० वर्षे वयाचा होता. दशरथची लेखी संमती न घेतल्याचे कारण खरेदीदस्तामध्ये नमूद करण्यात आलेले नाही.

हे म्हणणे खरे नाही की, सन १९९५ मध्ये भैरु येवले हयांच्या कुटुंबाची परिस्थीती चांगली होती. त्याचेवर सांगली बँकेचे कर्ज थकीत होते. हे म्हणणे खरे आहे की, तसा कोणताही कागदोपत्री पुरावा मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सांगली बँकेचा कोणताही उल्लेख खरेदीपत्रात नाही. भैरुवर सांगली बँकेचे कर्ज होते हे दर्शविण्याकरीता मी कागदोपत्री पुरावा दाखल करु शकेन परंतु त्यास वेळ लागेल. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९५ मध्ये भैरुवर कोणतेही कर्ज नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी केलेले खरेदीपत्रास तुकडेबंदी कायद्याची बाधा येत असल्याने प्रतिवादी दशरथ हयाने त्याबाबत तक्रारी केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्या तक्रारींच्या अनुषंगाने तहसीलदार व कलेक्टर हयांनी मला नोटीस काढल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यात ती इनाम वतनाची जमीन असल्याबाबत नोंद आहे. तथापि, त्या अनुषंगाने मी कोणतीही पूर्व परवानगी संबंधीत कार्यालयाकडून घेतलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीदस्त झाला त्यावेळी भैरु येवले व दशरथ येवले हयांचे एकत्र कुटुंब होते. हे म्हणणे खरे आहे की, मी दशरथ विरुध्द दावा मिळकतीच्या वाटपाची मागणीबाबत दावा दाखल केलेला नाही.

हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही इनाम वतनाची असल्याने पूर्व परवानगी न घेता मी केलेले खरेदीपत्र कायदेशीर नसल्याबाबत तहसीलदार हयांची तक्रार होती आणी त्या अनुषंगाने महसुली कोर्टात प्रकरण सुरु होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या प्रकारे ताराबाईचा अंगठा घेण्यात आला तशाचप्रकारे दशरथची सही खरेदीखतावर घेण्याकरीता मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दशरथ हा त्याच्या एकत्र कुटुंबाचा प्रमुख या नात्याने संपूर्ण कुटुंबाकरीता सन १९९३ पासुन सर्व व्यवहार बघत होता. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतात दावा मिळकत कशाकरीता खरेदी केली याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी केलेल्या खरेदीखतापूर्वी देखील दावा मिळकतीच्या उता–याला १ गुंठे क्षेत्रात छप्परपड अशी नोंद होती. हे म्हणणे खरे नाही की, ते छप्पर भैरु येवले हयांचे होते.

हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीत बेकायदेशीररित्या गोठा बांधला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या गोठयाबाबत तक्रारी झाल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, दि. २५.०९.२०१२ रोजी तहसीलदार वाई हयांनी मला तो गोठा हटविण्याबाबत पत्र पाठविले होते व तसे न केल्यास तो गोठा शासकिय खर्चाने हटविण्यात येईल अशी समज मला देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, सद्यस्थितीत दावा मिळकतीत गुरे असलेला गोठा नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, तेथे गोठा आहे परंतु त्यात गुरे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखतात नमूद असलेल्या १ गुंठे क्षेत्रावर प्रतिवादींचा ताबा आहे.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी दशरथ दावा मिळकतीतील माझ्या ताब्यात असलेल्या क्षेत्रास हरकत अडथळा करीत असल्याबाबत मी कलेक्टर हयांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता. आता नि.क्र.५७ वर दाखल असलेले पत्र दाखविण्यात आले. ते मीच दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यात दि. १६.११.२०१२ रोजी मी केलेल्या तक्रार अर्जात शेजारील प्रतिवादी दशरथ माझ्या ताब्यास त्रास देत असल्याबाबतचा मजकूर नमूद आहे.हे म्हणणे खरे आहे की, सदरील अर्जावर महसूल अधिकारी हयांनी कार्यवाही केलेली नाही. प्रतिवादी दशरथ व त्याच्या कुटुंबीयांनी दावा मिळकतीत घर बांधले व आम्हाला गोठा काढायला सांगीतला म्हणून प्रस्तुत दावा दाखल करण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्यक्ष दशरथ हयाने मला गोठा काढायला सांगीतला असा उल्लेख दाव्यात नाही. नि.क्र.५७ मध्ये नमूद असलेल्या अर्जाची प्रत मला सापडल्यास मी दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करण्यापूर्वी माझे व प्रतिवादींचे प्रत्यक्ष दावा मिळकतीबाबत बोलणे झाले नव्हते.

हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी दशरथ हयाने तहसीलदार हयांच्याकडे दिलेल्या तक्रार अर्जांवर मी माझे म्हणणे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या तक्रारींच्या अनुषंगाने मला नोटीस काढून माझे म्हणणे घेवून तहसीलदार हयांनी आदेश केले होते.

प्रकरण उर्वरीत उलटतपसाकरीता तहकूब.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

वाई. *स्वाक्षरी /–*

दि.०२.०८.२०२३ (आर.एम. भेंडे)

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.